# प्रकरण II

# लेखापरीक्षण चौकट

# प्रकरण II

# लेखापरीक्षण चौकट

## 2.1 लेखापरीक्षण उद्‌दिष्टे

महाराष्ट्र राज्यात योजनेच्या अंमलबजावणीचे संपादणूक लेखापरीक्षण खालील बाबींची खात्री करण्यासाठी करण्यात आले:

- संबंधित नियम व नियमांचे पालन करून अधिनियमाची उद्‌दिष्टे साध्य करण्यासाठी नियोजन प्रक्रिया आणि वित्तीय व्यवस्थापन पद्‌धती पुरेशा प्रमाणात तयार केल्या गेल्या;
- रोजगाराच्या संधी योग्य प्रमाणात मिळाल्या, तसेच पुरेशा प्रमाणात रोजगार निर्मिती झाली, ज्यामुळे नमूद केल्यानुसार सामाजिक संरक्षण आणि उपजीविकेची सुरक्षितता निर्माण झाली;
- इतर कार्यक्रम/योजनांशी एकत्रीकरण सुनिश्चित करताना नियम आणि नियमांचे पालन करून टिकाऊ आणि उपयुक्त मालमत्ता निर्माण करून राखल्या गेल्या; आणि
- अधिक पारदर्शकता आणि दायित्व साध्य करण्यासाठी योग्य आणि पुरेसे संनियंत्रण, सामाजिक अंकेक्षण आणि तक्रार निवारण प्रणाली अस्तित्वात होत्या आणि त्या कार्यरत होत्या.

## 2.2 लेखापरीक्षणाचे निकष

संपादणूक लेखापरीक्षणाचे मूल्यांकन करणारे लेखापरीक्षण निकष खालीलप्रमाणे होते:

- महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम व त्यातील सुधारणा;
- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, 2005, त्यातील सुधारणा आणि या अधिनियमांतर्गत जारी करण्यात आलेले नियम;
- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम कार्यचालन मार्गदर्शक तत्त्वे, 2013;
- भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणारी वार्षिक मुख्य परिपत्रके;
- राज्य शासन आणि भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने जारी केलेले शासन निर्णय, परिपत्रके आणि सूचना.

## 2.3 लेखापरीक्षणाची व्याप्ती आणि कार्यपद्धती

जून 2024 ते ऑगस्ट 2024 दरम्यान नियोजन विभाग (रोजगार हमी योजना), आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना), संचालक, सामाजिक अंकेक्षण तसेच निवडक जिल्हे, जिल्हा परिषदा आणि ग्राम पंचायतींमधील 2019-20 ते 2023-24 या कालावधीच्या अभिलेख्यांची पडताळणी करून संपादणूक लेखापरीक्षण करण्यात आले.


राज्यात ही योजना राबविणाऱ्या 34 जिल्ह्यांपैकी सहा जिल्हे जसे की अहिल्यानगर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, नागपूर आणि पालघर यांची 2019-20 ते 2023-24 या कालावधीतील जिल्ह्यांच्या एकूण खर्चाच्या आधारे स्तरीकृत यादृच्छिक नमुना पद्धतीचा वापर करून निवड करण्यात आली. तसेच, **परिशिष्ट 2.1** मध्ये दर्शविल्याप्रमाणे 2019-20 ते 2023-24 या कालावधीतील तालुक्यांच्या एकूण खर्चाच्या आधारे स्तरीकृत यादृच्छिक नमुना पद्धतीचा वापर करून 12 तालुके (प्रत्येक जिल्ह्यातील दोन तालुके) निवडण्यात आले. प्रत्येक तालुक्यामधून, 2019-20 ते 2023-24 दरम्यानचा खर्च विचारात घेवून बदली न करता आकाराच्या प्रमाणाच्या संभाव्यतेनुसार चार ग्राम पंचायती निवडण्यात आल्या. अशाप्रकारे, **परिशिष्ट 2.1** मध्ये दर्शविल्याप्रमाणे 48 ग्राम पंचायती निवडल्या गेल्या.

लेखापरीक्षणात संबंधित ग्राम पंचायतींच्या अधिकाऱ्यांसह 336 कार्यस्थळांची संयुक्त प्रत्यक्ष पडताळणी देखील करण्यात आली (प्रत्येक निवडलेल्या ग्राम पंचायतींकडून सात चालू किंवा पूर्ण झालेल्या कार्यस्थळांची यादृच्छिक आधारावर निवड करण्यात आली). या 336 कामांच्या संदर्भात हजेरी पट, मोजमाप पुस्तके आणि मजुरी देयकांची चाचणी-तपासणी देखील करण्यात आली. शिवाय, जॉब कार्डधारकांना योजनेची माहिती होती किंवा कसे, त्यांना वेळेवर मजुरी मिळाली किंवा कसे, त्यांना बेरोजगारी भत्ता मिळाला किंवा कसे, कामाच्या ठिकाणी सुविधा दिल्या आहेत,किंवा कसे इत्यादी गोष्टींची सुनिश्चिती करण्यासाठी 480 जॉब कार्डधारकांचे (प्रत्येक निवडलेल्या ग्राम पंचायतीतुन 10 लाभार्थी) सर्वेक्षण देखील केले.

जुलै 2024 रोजी प्रधान सचिव (रोजगार हमी योजना), नियोजन विभाग यांच्यासमवेत आगमन बैठक आयोजित करण्यात आली होती, ज्यामध्ये लेखापरीक्षणाची उद्दिष्टे, लेखापरीक्षणाचे निकष, लेखापरीक्षणाची व्याप्ती आणि कार्यपद्धती यावर चर्चा करण्यात आली. लेखापरीक्षणाच्या निष्कर्षांवर चर्चा करण्यासाठी मे 2025 मध्ये आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांच्या समवेत निर्गमन बैठक घेण्यात आली होती. आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांच्याकडून मिळालेली उत्तरे अहवालात समाविष्ट करण्यात आली आहेत (जून 2025).

नमुना जिल्ह्यांचे (34 पैकी सहा जिल्हे) भौगोलिक सादरीकरण **तक्ता 2.1** मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता 2.1: नमुना जिल्ह्यांचे भौगोलिक सादरीकरण**




## 2.4 महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या संदर्भातील यापूर्वीचे लेखापरीक्षण निष्कर्ष

राज्यातील योजनेच्या अंमलबजावणीवरील लेखापरीक्षण निष्कर्षांचा समावेश भारताच्या नियंत्रक आणि महालेखापरीक्षकांच्या स्थानिक स्वराज्य संस्थांवरील मार्च 2012 रोजी संपलेल्या वर्षाच्या अहवालाच्या परिच्छेद 2.1 मध्ये करण्यात आला होता (वर्ष 2013 चा अहवाल क्रमांक 6). अहवालावर लोक लेखा समितीच्या शिफारशी प्रतिक्षित होत्या (ऑगस्ट 2025).

## 2.5 आभार

लेखापरीक्षणा दरम्यान नियोजन विभाग (रोजगार हमी योजना), आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना), संचालक, सामाजिक अंकेक्षण, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि इतर क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या सहकार्य व मदतीबद्दल लेखापरीक्षण पथक आभारी आहे.

## 2.6 अहवालाची रचना

अहवालाची रचना खाली तपशीलवार दर्शविली आहे.

| | |
|---|---|
| **प्रकरण I** | परिचय |
| **प्रकरण II** | लेखापरीक्षण चौकट |
| **प्रकरण III** | नियोजन आणि वित्तीय व्यवस्थापन |
| **प्रकरण IV** | कामगारांची नोंदणी आणि मजुरी प्रदाने |
| **प्रकरण V** | कामांची अंमलबजावणी |
| **प्रकरण VI** | संनियंत्रण, सामाजिक अंकेक्षण आणि तक्रार निवारण |